G.E.Society's
SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik
**EVENT REPORT FORMAT**

-----------------------------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| **Name of the programme** | ३८ वा वर्धापन दिन |
| **Day and date** | मंगळवार दिनांक २८ जून २०२२. |
| **Organizing Committee/ Department (Mention Collaborating Agency, if any** | विद्यार्थिनी सभा |
| **Time** | सकाळी  ११.०० वाजता |
| **Topic/Theme** | • ११ वी १२ वी परीक्षेत यश मिळालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार |
| **Resource person** | डॉ. मो. स. गोसावी (सचिव, गो.ए.सोसायटी.नाशिक)<br>श्रीमती. पौर्णिमा चौगुले-श्रींगी (पोलीस उपायुक्त, नाशिक)<br>श्रीमती. शरयूताई देशमुख ( प्रसिद्ध उद्योजिका, नाशिक) |
| **No. of Students attended the programme** | १५० (प्राध्यापक ,विद्यार्थिनी आणि पालक) |
| **Brief summary** | दरवर्षी प्रमाणे महाविद्यालयाचा ३८ वा वर्धापन दिन यावर्षी मंगळवार दिनांक २८ जून २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयाच्या पाटणकर सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी गोखले एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ. मो.स.गोसावी हे होते तर प्रमुख अतिथी नाशिकच्या पोलीस उपायुक्त श्रीमती. पौर्णिमा चौगुले-श्रींगी या व प्रसिद्ध उद्योजिका श्रीमती. शरयू ताई देशमुख या होत्या. कार्यक्रमाच्या सुरवातीला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. कविता पाटील यांनी प्रास्ताविक व  आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. महाविद्यालयाच्या ३७ वर्षाच्या शैक्षणिक कारकीर्दीचा त्यांनी यावेळी आढावा घेतला.<br>प्रमुख अतिथी श्रीमती. शरयू ताई देशमुख यांनी आपल्या मनोगतात सध्याचा काळ आणि शिक्षण यासंदर्भात आपले विचार मांडले. श्रीमती. पौर्णिमा चौगुले-श्रींगी यांनी आपला जीवनप्रवास उपस्थितांसमोर उलगडून दाखविला. अलीकडचा काळ आणि विद्यार्थिनीनी समोरच्या सामाजिक, शैक्षणिक समस्या यांचा उहापोह त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला. अध्यक्षीय मनोगतात डॉ. मो.स.गोसावी यांनी गोखले एज्युकेशन संस्थेचा शैक्षणिक वारसा, एस.एम.आर.के महिला महाविद्यालयाच्या निर्मितीचा प्रवास आदी विषयांवर प्रकाश टाकला. या प्रसंगी ११ वी आणि १२ वी च्या परीक्षेत उत्तीर्ण होवून विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थिनींचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. 'शतरूपा' 'इंप्रेशन' या महाविद्यालयाच्या वार्षिक अंकांचे तसेच 'स्वयंप्रकाश' या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या संशोधनपर त्रैमासिकाचे प्रकाशन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रसिका सप्रे, प्रा. आश्लेषा कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी सभेचे प्रमुख प्रा. डॉ. विवेक खरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. नीलम बोकील तसेच सर्व विद्याशाखांचे प्राध्यापक व विद्यार्थी-पालक उपस्थित होते. |
| | प्रा.डॉ.विवेक कमलाकर खरे |
| **(Attach Photographs)** | सोबत कार्यक्रमाचे छायाचित्रे जोडीत आहे. |


Shrimati Manjulabai Raojisa Kshatriya Arts, Fine Arts
Babubhai Kapadia Commerce &
Athawale Kulkarni Home-Science
Mahila Mahavidyalaya, Nashik - 422005




Gokhale Education Society's
Shrimati Manjulabai Raojisa Kshatriya Arts, Fine Arts
Babubhai Kapadia Commerce &
SHATARUPA
2021-22


Shrimati Manjulabai Raojisa Kshatriya Arts, Fine Arts
Babubhai Kapadia Commerce &
Athawale Kulkarni Home-Science
Mahila Mahavidyalaya, Nashik - 422005
Vision of the College
" Upliftment of Social Status of
Women Through Quality Education "


Vision of the College
" Upliftment of Social Status of
Women Through Quality Education "